शासकीय वस्तुसंग्रहालय, सिंदखेडराजा येथे संरक्षित भिंत बांधण्याकरीता प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : संग्रह-२०२६/प्र.क्र.१३९/ई १७७२८९९/सां.का.३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १० ऑगस्ट, २०२६

वाचा :- संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांचे पत्र क्र.DOAM-१४०४७(१३)/३/२०२६-०६, दि.३०.०४.२०२६

प्रस्तावना :-

शासकीय वस्तुसंग्रहालय, सिंदखेडराजा, जि.बुलढाणा या संग्रहालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात मोकळी जागा उपलब्ध आहे. सध्या सदर ठिकाणी जनावारांचा मुक्त वावर, कचरा व इतर अवांछित वस्तू टाकण्यात येत असल्याने अस्वच्छतेचे प्रमाण वाढत असून, संग्रहालयाचे सौंदर्य, स्वच्छता व सुरक्षेवर याचा परिणाम होत आहे. भविष्यात सदर ठिकाणी अतिक्रमण होण्याची शक्यताही आहे. त्यामुळे संग्रहालयाच्या मोकळ्या जागेत ३२५ फुट लांबीची (रुंदी २.५ फुट X उंची १२ फुट) संरक्षित भिंत (कंपाऊंड वॉल व तार फेन्सिंग) संरक्षित भिंत बांधण्यासाठीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांनी उपर्निर्दिष्ट पत्रान्वये केली आहे. त्यानुसार सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासकीय वस्तुसंग्रहालय, सिंदखेडराजा, जि.बुलढाणा या संग्रहालयाच्या मोकळ्या जागेत संरक्षित भिंत (कंपाऊंड वॉल व तार फेन्सिंग) बांधण्यासाठी येणाऱ्या ₹४४,९०,८८५/- (अक्षरी रुपये चव्वेचाळीस लक्ष नव्वद हजार आठशे पंचाऐंशी मात्र) (सर्व करांसहित) इतक्या रकमेस या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

०२. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास या संबंधिच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर कामाची तांत्रिक तपासणी करण्याची जबाबदारी संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय व संबंधित अभिरक्षक यांची असेल.

०३. हा शासन निर्णय विअप्र-२०१३/प्र.क्र.२०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला उपविभाग तीन मधील अनुक्रमांक ४ मधील परिच्छेद क्र. २७ (२) "अ" नुसार तसेच वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थसंकल्प-३, दिनांक ०९ एप्रिल, २०२६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

०४. यासाठी होणारा खर्च मागणी मागणी क्र. झेडडी-२, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, (०१) (०२) विविध वस्तू संग्रहालयातील विशिष्ट विभागाची पुनर्रचना व विकास (राज्य) (कार्यक्रम) (२२०५ १३२९) २७-लहान बांधकामे या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०८१०१५१०३१४७४३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NANDA MARUTI RAUT

Digitally signed by NANDA MARUTI RAUT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs,
2.5.4.20=1983A6357BDEA5C5091136D73EC0B1D7D99AF67DF3CCA676C00FAD04572B4AA9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BAF9D9317025580944685E047B9C52D64C532684054F19E1F02C374B78E1773F, cn=NANDA MARUTI RAUT
Date: 2026.08.10 15:11:23 +05'30'

(नंदा राऊत)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. उपसचिव (सां.का.३), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. अभिरक्षक, शासकीय वस्तुसंग्रहालय सिंदखेडराजा.
५. महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता)/, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. जिल्हा कोषाधिकारी, बुलढाणा.
९. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.निवड नस्ती, सां.का.३.